# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेसनोट क्रमांक ३१०/२०२४** **दिनांक- १७/०८/२०२४.**

## "अल्पवयीन मुलींस अपहरण करुन लैंगिक अत्याचार करण्याऱ्या आरोपीतांस अटक करण्यात नवघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश"

नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ४५०/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३७(२) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला असुन त्यातील फिर्यादी वय-४५ वर्षे, रा.नवघर फाटक रोड, रा.भाईंदर पुर्व यांनी समक्ष पोलीस ठाणेस येवुन कळविले की, त्यांची अल्पवयीन मुलगी वय-१४ वर्षे, तसेच तिच्या दोन अल्पवयीन मैत्रीणी यांना कोणीतरी अज्ञात इसमांनी फिर्यादी व साक्षीदार यांचे कायदेशीर रखवालीतुन फुस लावुन पळवुन नेलेबाबत फिर्यादी यांनी पोलीस ठाणेस येवुन तक्रार दिल्याने वरीप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा अल्पवयीन बालकांसंदर्भाचा गंभीर स्वरुपाचा असल्याने तसेच बळीत मुलगी हिंदु धर्मीय व आरोपी इसम हा इतर धर्माचा असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता निर्माण होण्याची शक्यता असल्याने पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, सहा पोलीस आयुक्त, नवघर विभाग व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे नमुद गुन्हयाचा तपास गुन्हे प्रकटीकरण पथकाने सुरु करुन गुन्हयातील अल्पवयीन मुलगी व तिच्या दोन अल्पवयीन पिडीत साक्षीदार यांचा माग काढुन त्यांना ०३ आरोपीत इसम यांचे ताब्यातुन सोडवण्यात आणले आहे. पिडीत व महिला साक्षीदार यांचेकडे तपास करता त्यांनी आरोपी यांनी त्यांचेसोबत जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केले असल्याचे सांगुन तक्रार केली आहे. सदर गुन्हयात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ६४, ३ (५) सह बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनीयम २०१२ चे कलम ४, ८, १२ प्रमाणे वाढवुन लावण्यात आले असुन सदर गुन्हयाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. तुकाराम सकुंडे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. मधुकर पांण्डेय, पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय, श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, श्री.राजेंद्र मोकाशी, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचा मार्गदर्शनाखाली धिरज कोळी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोनि/अशोक कांबळे (गुन्हे) सपोनि/तुकाराम सकुंडे, सपोनि/अमोल तळेकर, पोउनि/ज्ञानेश्वर आसबे, पोहवा/संतोष पाटील, पाटील, सुरेश चव्हाण, घुगे, जयप्रकाश जाधव, पोशि/घुणावत, ओंकार यादव, मुकेश निकम, अस्वार, पवार तसेच मसुब/कुणाल हिवाळे यांनी केलेली आहे.

**-------------0000-------------**